# वसंतऋतु

बहरून दे वसंत रानावनात
फुलावी नवचैतन्याची पालवी वृक्षवेलीत
कडूलिंबाची हिरवी चोळी लेऊन
दरवळू दे बकुळफुलांचा मादक गंध

बहरू दे वसंत आम्रतरूवर
फुलवू दे कोकिळेस सूरांचा मोरपंखी पिसारा
खुलू दे रम्य बहावा गुलमोहराच्या कुशीत
शिंपू दे हळदीकुंकवाचे सडे रस्त्यारस्त्यावर

बहरू दे वसंत नवयौवनांच्या मनात
दरवळू दे मादक गंध रोमरोमात
अन वनदेवीच्या स्वागताही पळसफुलांना
घालू दे जाळ पायघड्या रानावनात

बहरू दे वसंत पुन्हा अंगणात
नाचावे फिरून गोकूळ घराघरात
रुणझुणू दे पैंजण सानपावलांत
गुंजू दे नादात सारा आसमंत

बहरू दे वसंत पुन्हा जीवनात
फुलू दे आठवणींचा मोहोर मनात
फुटू दे नवपालवी वठलेल्या वृक्षास
दरवळू दे गंध वाळल्या बकुळफुलांचा

बहरू दे वसंत नवकाव्याच्या मनात
व्हावे नवसृजन, नवनिर्मिती काव्यात
फुलवू या चैतन्याचे झरे जनमानसात
रस-रंग-गंध लेऊन आला ऋतु वसंत
आला ऋतु वसंत

सौ. ऐश्वर्या डगांवकर